पुण्य नगरी

# राज्यात रेल्वे उड्डाणपुलांचे जाळे : मुख्यमंत्री

## रेल्वेफाटक असणाऱ्या मार्गावर आगामी काळात आणखी २०० उड्डाणपूल उभारणार !

। नागपूर : राज्यात एक काळ असा होता की, जेव्हा १० वर्षांत २ उड्डाणपूल तयार होत होते. मात्र, आता वर्षभरात २५ उड्डाणपूल महारेलच्या माध्यमातून तयार होत आहेत. राज्यात आगामी काळात रेल्वे फाटक असणाऱ्या मार्गावर आणखी २०० उड्डाणपूल व अंडरपासची कामे महारेलच्या माध्यमातून करण्यात येईल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला. महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.च्या माध्यमातून राज्यातील ७ जिल्ह्यांत बांधण्यात आलेल्या ७ उड्डाणपुलांचे लोकार्पण ऑनलाइन पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते करण्यात



आले. त्या वेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, महारेलने राज्यात उड्डाणपूल बनवण्याच्या गतीचा एक विक्रम केला आहे. सुरेश प्रभू रेल्वे मंत्री असताना मी राज्याचा मुख्यमंत्री होतो. राज्यात मोठ्या प्रमाणात रेल्वे उड्डाणपूल बांधण्यासंदर्भात चर्चेतून डेडिकेटेड कंपनी तयार करण्याचा निर्णय घेतला. रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र सरकारच्या प्रत्येकी ५० टक्के भागीदारीतून महारेलची स्थापना झाली. राजेश कुमार जयस्वाल यांना व्यवस्थापकीय संचालक म्हणून जबाबदारी देण्यात आली. यानंतर राज्यात गतीने तसेच ▶▶ पान ७ वर

### सात जिल्ह्यांतील ७ उड्डाणपुलांचे लोकार्पण

नागपूर येथील गोधनी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्रमांक २९३ येथील उड्डाणपूल, वर्धा येथील सिंधी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्रमांक १०३ येथील उड्डाणपूल, अमरावती येथील चांदूर रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्रमांक ७० येथील उड्डाणपूल, चंद्रपुरातील बाबूपेठ येथील उड्डाणपूल, धुळे येथील दोंडाईचा शहरातील उड्डाणपूल, जळगाव येथील रेल्वे स्थानकाजवळील उड्डाणपूल व वाशीम येथील रेल्वे स्थानकाजवळील उड्डाणपुलांचे रविवारी लोकार्पण करण्यात आले.

# राज्यात रेल्वे उड्डाणपुलांचे जाळे : मुख्यमंत्री

गुणवत्तापूर्ण रेल्वे उड्डाणपूल बांधण्यास सुरुवात झाली. आधी एक सरकार भूमिपूजन करायचे. त्यानंतर येणाऱ्या सरकारच्या काळातही कामे अर्थवट राहायची व तिसरे सरकार त्या कामांचे उद्घाटन करायचे. मात्र, २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही स्थिती बदलवली. आता जे सरकार भूमिपूजन करते तेच सरकार त्या कामाचे उद्घाटन करते. मागील १० वर्षांत महाराष्ट्र व नागपुरात इन्फ्रास्ट्रक्चरची अभूतपूर्व कामे झाली आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून व राज्य सरकारच्या माध्यमातून होणाऱ्या कामांमुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलत आहे. देशातील सर्वांत जास्त इन्फ्रास्ट्रक्चरची कामे महाराष्ट्रात सुरू आहेत.

या वेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आ.कृष्णा खोपडे, आ.कृपाल तुमाने, आ.किशोर जोरगेवार, आ.श्याम खोडे, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल यांची उपस्थिती होती. संचालन श्वेता शेलगावकर यांनी केले. आभार महारेलचे महाव्यवस्थापक जितेंद्र कुमार यांनी मानले.